admn 18-19


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

आय्एस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com　　दूरध्वनी (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org　　फॅक्स (०२०) २५५३ ३७६४.


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/　　दि.　　जून,२०१८

## परिपत्रक

विषयः- कृषी पदविका व पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता ऑनलाईन ७/१२ उतारे ग्राह्य धरण्याबाबत.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदविका व पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेंतर्गत मागील दोन वर्षाच्या कालावधीतील ७/१२ उताऱ्यास १२ गुणांचा अधिभार देण्याची तरतूद आहे. तथापि, सध्या राज्यात ७/१२ उतारे ऑनलाईनद्वारे उपलब्ध होत आहेत. यामुळे काही भागातून तलाठयांची स्वाक्षरी असलेले ७/१२ उतारे उमेदवारांना प्राप्त होत नाहीत. तर बऱ्याच प्रकरणी ऑनलाईन ७/१२ उताऱ्यामध्ये वर्ष नमूद करण्यात आलेले नसते. यामुळे प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद करण्यात आल्याप्रमाणे ७/१२ उतारे प्राप्त होत नसल्याचे निदर्शनास येत आहे.

उमेदवारांना त्यांच्याकडे असलेल्या शेत जमिनीचा अधिभार मिळण्याच्या दृष्टिकोनातून तसेच ऑनलाईन ७/१२ उताऱ्यामध्ये वर्ष नमूद नसल्याने या परिपत्रकाद्वारे संबंधितांच्या निदर्शनास आणण्यात येते की, प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्याच्या तारखेपासून प्रवेश अर्ज दाखल करण्याच्या तारखेपर्यंत download केलेले ऑनलाईन ७/१२ उतारे अधिभाराकरिता ग्राह्य धरण्यात येत आहेत.

(रविंद्र जगताप) भा प्र से
महासंचालक

प्रति,

१. कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिनस्त सर्व विद्यालये / महाविद्यालयांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून योग्य ती कार्यवाही करावी.

२. मे. कल्प टेक्नॉलॉजीज प्रा.लि., तिसरा मजला, गोपाळ हाऊस, हॉटेल किमयाजवळ, कर्वे रोड, कोथरुड, पुणे ४११ ०२९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी परिपत्रकानुसार ७/१२ उतारे ग्राह्य धरून अधिभार देण्याची कार्यवाही करावी.

३. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.
यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

४. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेसर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१ यांना माहितीस्तव सादर...